MCAER
कृषि परिषद

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद

१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७

ई मेल- edn_mcaer@rediffmail.com दूरध्वनी क्र.- ०२०-२५५२६८८६ संकेतस्थळ- www.mcaer.org

जा.क्र.मकृप/शिक्षण-१/३३२६/६७६/२८५३ दि.०४/०९/२०२६

## परिपत्रक

**विषय : पदव्युत्तर प्रवेश प्रक्रिया २०२६-२७ चे सुधारित वेळापत्रकाबाबत...**

राज्यातील चारही कृषी विद्यापीठांतर्गत पदव्युत्तर अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया दि.२९/०७/२०२६ पासून सुरु झालेली आहे. याअंतर्गत पहिल्या प्रवेश फेरीच्या वाटप यादीची प्रसिध्दी दि.०२/०९/२०२६ रोजी सायं. ५.३० नंतर होती. तसेच रिपोर्टिंगचा कालावधी दि.०३/०९/२०२६ ते दि.०५/०९/२०२६ आहे.

तथापि, प्रवेश प्रक्रियेच्या संगणक आज्ञावलीमधील तांत्रिक अडचणींमुळे सदर यादी विहित कालावधीत प्रसिद्ध होउ शकली नाही. यास्तव, पदव्युत्तर प्रवेश प्रक्रियेकरिता पहिल्या प्रवेश फेरी पासून पुढील वेळापत्रक खालीलप्रमाणे सुधारीत करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कार्यक्रम | सुधारीत दिनांक |
|---|---|---|
| १. | (i) पहिल्या प्रवेश फेरीच्या वाटप यादीची प्रसिध्दी. | ०४-०९-२०२६ (सायं.५.३० नंतर) |
| | (ii) रिपोर्टिंगचा कालावधी | ०७-०९-२०२६ ते ०९-०९-२०२६ |
| २. | (i) दुसऱ्या प्रवेश फेरीच्या वाटप यादीची प्रसिध्दी. (रूपांतरासह) | १२-०९-२०२६ (सायं.५.३० नंतर) |
| | (ii) रिपोर्टिंगचा कालावधी | १५-०९-२०२६ ते १७-०९-२०२६ |
| ३. | रिक्त जागांच्या यादीची प्रसिध्दी | १९-०९-२०२६ |
| ४. | **कृषी महाविद्यालय, शिवाजीनगर, पुणे येथे तिसरी प्रवेश फेरी** (**प्रवेश माहिती पुस्तिकेतील परिशिष्ट 'के'** येथील कार्यपध्दतीनुसार) | २१-०९-२०२६ व २२-०९-२०२६ |
| ५. | वर्ग सुरु होण्याचा दिनांक | २१-०९-२०२६ |

कृपया सर्व प्रवेशोच्छुक उमेदवार व इतर संबंधितांनी याची नोंद घ्यावी.

**मा.महासंचालक यांच्या मान्यतेने**

**(किशोर शिंदे)**
**संचालक शिक्षण**

**प्रतः-**

(१) कुलसचिव, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी / डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला / वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी / डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठ, दापोली यांना माहितीस्तव.

(२) मे.विबास टेक्नोलॉजी, पुणे यांना सूचित करण्यात येते की, सर्व संबंधितांना अवगत होण्याच्या दृष्टिकोनातून त्यांनी सदरचे परिपत्रक कृषी परिषदेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून द्यावे.

(३) मे.ॲनालिटीका बिझीनेस सोल्युशन्स, पुणे यांना सुचित करण्यात येते की, सर्व संबंधितांना सुधारीत वेळापत्रकाबाबत अवगत होण्याच्या दृष्टीकोनातुन सदर परिपत्रक संकेतस्थळावर उपलब्ध करून द्यावे. तसेच सर्व संबंधितांना व महाविद्यालयांना भ्रमणध्वनी / ई-मेल संदेशाद्वारे अवगत करण्यात यावे.